## संपादकीय

'नवज्योत' या आंतरविद्याशाखीय आंतराष्ट्रीय संशोधन पत्रिकेच्या तमाम लेखक वाचक आणि हितचिंतकास सदर अंक समिर्पित करताना हर्ष होत आहे. वैश्विक पातळीवर तीव्र गतीने होणारे बदल आणि त्याचे मानवी मुल्यांवर होणारे दूरगामी परिणाम चिंता व चिंतनाचा विषय झालेला आहे. आपल्या देशाचा विचार करतांना भारत सरकारची 'सबका साथ सबका विकास' निती आणि त्यांचे परिणाम नव्या भारताच्या निर्माणाकरिता सैध्दांतिक व व्यवहार्य पातळीवर कसे फलद्रुप होणार हा राज्यशास्त्राच्या व एकूणच मानव्यशास्त्राच्या अभ्यास विश्वाचा विषय बनलेला आहे. त्या दृष्टीकोनातून सर्वव्यापी ' सहभागी विकास व सहभागी लोकशाही' हे समिकरण प्रत्यक्षात साकार करणे व्यवस्थेपुढील एक आव्हान बनलेले आहे.

विश्व, राष्ट्र, प्रांत, विभाग, जिल्हा, तालुका, गाव, कुटुंब आणि व्यक्ति या पातळयांवरील संघर्ष निवारणाकरीता लोकशाही मूल्यांचा उपयोग प्रभावी पध्दतीने केल्यास हे 'विश्वचिया माझे घर' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होण्यास मदत होईल. या धारणेतून संयुक्त राष्ट्राने 'लोकशाही ः संघर्ष निवरण' हा विषय यावर्षीचा जाहीरनामा म्हणून पुढे आणलेला आहे.

या संबंध पार्श्वभूमीवर नवज्योतच्या शोध निबंधकारांनी आपल्या विषयाची मांडणी या दिशेने केल्यास आंतरविद्याशाखीय विश्लेषणाच्या कक्षा अधिक व्यापक होतील व पर्यायाने गुणात्मक दर्जा सुध्दा उंचावेल अशी रास्त अपेक्षा आहे.

नवज्योतचे सल्लागार मंडळ, संपादक मंडळ आणि मूल्यमापन समिती यांचे सक्रीय योगदान तसेच लेखक, वाचक व हितचिंतकांच्या सहकार्यामुळे 'नवज्योत' आपला गुणात्मक दर्जा अधिक गतिमान करणार यात शंका नाही.

नवज्योत चळवळीतील सर्व संबंधितास आगामी दीपावली पर्व 'शांतातामय सहजीवनासाठी सुखकर ठरो' या मनोभावे शुभेच्छासह!

प्रा. डॉ. पी. एच. सूर्यवंशी

संपादक